पूर्व मंजूरीसाठी

**प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), महाराष्ट्र यांचा भारतमाला परियोजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील धाराशिव जिल्हयातून सुरत (गुजरात) ते चेन्नई (तामीळनाडू) अहमदनगर-सोलापूर-अक्कलकोट-महाराष्ट्र/कर्नाटका सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), महाराष्ट्र यांचा भारतमाला परियोजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील धाराशिव जिल्हयातून जाणाऱ्या सुरत (गुजरात) ते चेन्नई (तामीळनाडू) अहमदनगर-सोलापूर-अक्कलकोट-महाराष्ट्र/कर्नाटका सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १८ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव (पूर्वीचे उस्मानाबाद) येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री परमेश्वर कांबळे उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. महेंद्रकुमार कांबळे, अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री सुजित ढोलम, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती,प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), महाराष्ट्र यांचा भारतमाला परियोजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील धाराशिव जिल्हयातून जाणाऱ्या सुरत (गुजरात) ते चेन्नई (तामीळनाडू) अहमदनगर-सोलापूर-

अक्कलकोट-महाराष्ट्र/कर्नाटका सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ नुसार सदरहू प्रकल्प संवर्ग अ मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला होता व त्या अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १७.०५.२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक १८ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. MPCB/JD(WPC)/ENV-PH/B 231102-FTS-0225 Dtd. 02.10.2023 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, धाराशिव,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>छत्रपती संभाजीनगर,<br>जिल्हा- छत्रपती संभाजीनगर, | - सदस्य |

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
लातूर

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी जनसुनावणी ३० दिवसाच्या अगोदर स्थानिक दैनिक लोकमत, छत्रपती संभाजीनगर यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या अवलोकनार्थ व माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, धाराशिव,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, धाराशिव,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा/तुळजापूर, तालुका – परंडा / तुळजापूर, जिल्हा-धाराशिव इ.

६) **तालुका-परंडा, जिल्हा-धाराशीव, ग्रामपंचायत कार्यालये** – मौजे चिंचपूर (बु.), पांढरेवाडी, चिंचपूर (खु.), उंडेगाव, रत्नापूर, मलकापूर, आनाळा, रोहकल, साकत (बु.), कुंभेफळ, जाखेपिंपरी, अरणगांव, टाकळी, राजुरी, वाडी राजुरी, घारगाव, जवळा, कांदळगाव, शिरसाव, हिंगणगाव (बु.) इ.

७) **तालुका-तुळजापूर,जिल्हा-धाराशीव,**
**ग्रामपंचायत कार्यालये** – मौजे खुंटेवाडी, काटी, दहिवडी, सवरगाव, सांगविकाटी, सुरतगाव, पिंपळा (खु), पिंपळा (बु.), देवकुरळी, धोत्री, काटगाव इ.

८) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

९) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण भवन, प्लॉट नं. अ-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे नांव — औरंगाबाद),

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर जिल्हा उद्योग समुह इमारत, भूखंड क्रं. पी-१०, एमआयडीसी लातूर (४१३ ५१२)

१२) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना ३९ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्ष यांनी सांगितले की पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सादरीकरणाव्दारे प्रकल्पाविषयी माहिती दिली. त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र यांचा भारतमाला परियोजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर-सोलापूर-अक्कलकोट-महाराष्ट्र /कर्नाटक सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकसित करण्याचे नियोजन केलेले असून ही पर्यावरणविषयक जनसुनावणी ही महाराष्ट्र राज्यातील धाराशिव जिल्हयातून जाणाऱ्या अहमदनगर- सोलापूर

- अक्कलकोट - महाराष्ट्र / कर्नाटका सीमावर्ती भागातून प्रस्तावित सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग विकास करणे संदर्भात आहे. या प्रकल्पामुळे धाराशिव जिल्ह्यातील गावे बाधित होतील. हा प्रकल्प धाराशिव जिल्हयातून पुढे सोलापूर जिल्हयात जातो. सदरहू प्रकल्प हा वनक्षेत्रातून जात आहे.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाचा बांधकाम कालावधी ही सुमारे तीन वर्षांचा असून प्रकल्पाचा एकूण खर्च अंदाजे रुपये ७२१९.४९ कोटी एवढा आहे. भारत सरकारने पारित केलेले सर्व पर्यावरणीय निर्देश हे प्रकल्प बांधकाम टप्प्यात पाळण्यात येतील.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प बांधकाम टप्प्यात व पूर्ण झाल्यानंतर प्रदूषण नियंत्रणासाठी योजण्यात येणा—या पर्यावरण व्यवस्थापन योजनांविषयी (ईएमपी) सविस्तर माहिती दिलेली आहे. तरी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक प्रश्नच उपस्थित करण्याची सूचना करण्यात येते. त्यांनी उपस्थितांना सांगितले की भूतकाळाचा विचार न करता भविष्यकाळाचा विचार करण्यात यावा. पर्यावरणाशिवाय इतर विषय, स्थानिक विषय येथे उपस्थित करु नयेत, त्यासाठी वेगळे व्यासपीठ उपलब्ध आहे, त्यामुळे ते प्रश्न येते गृहित धरले जाणार नाही.आपण केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल.

त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम नांव व राहण्याचे ठिकाण/गाव सांगण्यात यावे. सर्वांच्या सूचना, आक्षेप यांची नोंद करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी निवेदन सादर करावयाचे आहेत, ते त्यांनी सादर करावेत. त्यास प्रकल्प प्रवर्तकांकडून लेखीस्वरुपात उत्तर देण्याची सूचना करण्यात येत असून ते बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येईल. तरी एकाएकाने येऊन लेखी निवेदन सादर करावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>श्री महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल, तालुका. परंडा, जिल्हा- धाराशिवः-</u>

बैठकीचा मूळ विषय काय आहे, तो येथे चांगल्याप्रकारे विषद करण्यात यावा. नागरिकांचे काय आक्षेप असावेत, जेणेकरुन नागरिकांचे या रस्ता विकसनाला सहकार्य असावे. कारण येथे जे ग्रामस्थ आलेले आहेत, त्यांना पर्यावरण म्हणजे काय हेच कळत नाही. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी आगाऊ तीस दिवस या बैठकीची जाहिर सूचना प्रकाशित केलेली आहे. येथील लोक विचारतात की पर्यावरण म्हणजे काय, त्यावर काय प्रश्न विचारायचे. तसेच येथे प्रकल्पाचे पर्यावरण आरव्ही असोशिएट्स आलेले आहेत. ते एनएचएआयचे प्रतिनिधी आहेत काय? येथे शासन आहे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आयोजक आहे. नागरिक आलेले आहेत. तर सुनावणी ही सहसा नागरिक विरुध्द कंपनी अशी असते. येथे कोण कोणाच्या विरुध्द आहे हेच कळत नाही. याबाबत स्पष्टीकरण व्हावे. आम्हांला ज्या काही शंका असतील त्या विचारता येतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी बैठकीत सांगितलेले आहेच. येथे कोणी कोणाचाही विरोधक नाही. हा शासनाचा जनतेशी सुसंवाद आहे. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे येथील, मृदा/माती, पाणी, हवा यांवर कोणते संभाव्य परिणाम होतील, त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी नियोजित केलेल्या विविध उपाययोजना याची माहिती येथील जनतेस अवगत करणे हा या बैठकीचा उद्देश आहे. ही खुली चर्चा आहे. हे जनतेसाठी एक खुले व्यासपीठ उपलब्ध केलेले आहे.

त्यांनी पुढे सांगितले की आयोजक यांनी सुरवातीसच सांगितले की या बैठकीत कोणताच निर्णय घेतला जात नाही प्रकल्पाची शिफारस करण्यात येत नाही, प्रकल्प नाकारतसुध्दा नाही. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप, विचार यांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत भारत सरकारच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत निर्णय घेते. आपण करत असलेल्या सूचना, विचार, टीकाटिप्पणी, आक्षेप यांचे स्वागतच आहे.

**श्री महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल** यांनी पुढे सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार मे. आरव्ही असोशिएट्स आर्किटेक्ट्स इंजिनियर्स एँड कन्सलटंट प्रा. लिमिटेड यांनी तयार केलेली कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करण्यात आलेला आहे. तर सदरहू अहवाल हा प्रमाणित अहवाल (Standardized Report) आहे काय?

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन, २०००६ अधिसूचनेनुसार काही विशिष्ट प्रकल्पांना प्रकल्प कार्यान्वित करण्याअगोदर पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्यासाठी जनसुनावणी घेणे अनिवार्य आहे, प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA Report) तयार करण्यासाठी टीओआर प्राप्त करणे बंधनकारक आहे. सदरहू अहवाल हा प्रारुप अहवाल आहे. जनसुनावणी नंतर स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन केंद्र सरकारला सादर करावा लागतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती अभ्यास करुन निर्णय घेते. स्थानिकांचा जनसुनावणीत क्रियाशील सहभाग निश्चितच आवश्यक आहे. कारण आपण जे पर्यावरणीय सूचना, आक्षेप उपस्थित कराल, ते सर्व प्रकल्प प्रवर्तकांना ईआयए अहवालात अंतर्भाव करता येईल. सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA Report) हा केन्द्र सरकारच्या नाबेट संस्थेने मंजूर केलेल्या संस्थेकडूनच तयार करणे बंधनकारक असल्याने प्रकल्प प्रवर्तक National High Way Authority of India यांनी सदरहू अहवाल हा नाबेटमान्य संस्थेकडून मे. आरव्ही असोशिएट्स आर्किटेक्ट्स इंजिनियर्स एँड कन्सलटंट प्रा. लिमिटेड यांच्यातर्फे करण्यात आलेला आहे.

**श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी** आक्षेप नोंदविला की जर हा अहवालच चुकीचा असेल, तर या अहवालात सुधारणा करून परत जनसुनावणी आयोजित करण्यात येईल काय?

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीसच आयोजक यांनी माहिती दिलेली आहे की येथे उपस्थितांनी उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येणार असून त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप व सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा अध्यक्षांच्या मान्यतेने मुख्यालय,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथीत तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी विचारणा केली की या बैठकीचे इतिवृत आम्हांला उपलब्ध होईल का?

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू इतिवृत वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येईल.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी विचारणा केली की बैठकीत प्रस्तावित प्रकल्पाबाबत प्रत्येक मुद्द्यांवर चर्चा होईल वा सरसकट उत्तरे देण्यात येतील. त्यांनी सांगितले की पीडित नागरिक आहे. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपणास जे काही मुद्दे मांडावयाचे आहेत, ते उपस्थित करण्यात यावेत.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी आक्षेप नोंदविला प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार मे. आरव्ही असोशिएट्स आर्किटेक्ट्स इंजिनियर्स एँड कन्स्लटंट प्रा. लिमिटेड यांनी तयार केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल हा पूर्णपणे चुकीचा आहे. त्यांनी अनेक भाषांचा वापर केलेला आहे. तर या चुकीच्या पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालानुसार पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करणे हे चुकीचे आहे. अशी चुकीची सुनावणी आयोजित करणे हे योग्य होणार नाही. मी येथे १२५ कि.मी. वरुन आलेलो आहे. येथे बरेच नागरिक वेळेत पोहचू शकलेले नाहीत. तर जनसुनावणी चालू ठेवायची का नाही याबाबत नागरिकांचे म्हणणे घ्यावे. या अहवालात सारखे लोकोपयोही शब्दाचा वापर करण्यात आलेला आहे. तर लोकोपयोही म्हणजे काय? हा अहवाल तयार करताना कुठल्या गावातील लोकांचे सहकार्य घेतले, कुठे नमुने गोळा केले, कुठे पंचनामे घेतले. कुठले मातीचे नमुने घेतले, केव्हा घेतले निबंध लिहिल्यासारखा हा अहवाल दिलेला आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली आपण सूचना, आक्षेप हे मुद्देसुद उपस्थित करण्यात यावेत. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना त्याबाबत खुलासा करण्यास सांगण्यात येईल.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी पहिला आक्षेप नोंदविला की पर्यावरण सल्लागार मे. आरव्ही असोशिएट्स आर्किटेक्ट्स इंजिनियर्स एँड कन्स्लटंट प्रा. लिमिटेड यांनी तयार केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल विसंगत भाषेत केलेला आहे. हा अहवाल चुकीच्या डेटावर बेजबाबदार व पूर्णपणे चुकीचा केलेला आहे. हे सदोष अहवाल बाधित ग्रामपंचायत कार्यालयात पाठविण्यात आलेले आहेत.

तरी संबंधित पर्यावरण सल्लागार मे. आरव्ही असोशिएट्स आर्किटेक्ट्स इंजिनियर्स एँड कन्स्लटंट प्रा. लिमिटेड यांनी सामान्यांची दिशाभूल केलेली आहे म्हणून पर्यावरण सल्लागार संस्थेला दंड आकारण्यात यावा आणि त्यांच्यावर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यास कायमस्वरुपी बंदी घालण्यात यावी आणि सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा दुरुस्त करुन पुनर्प्रकाशित करण्यात यावा आणि परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

अध्यक्ष आणि सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पर्यावरण सल्लागार यांना उत्तर देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ही प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल असून आपले आक्षेप ज्या तांत्रिक मुद्द्यांवर आहेत, ते सांगावेत, म्हणजे आम्हांला त्यात सुधारणा/दुरुस्ती/बदल करता येतील.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण हा विषय संवेदनशील असून दैनंदिन जीवनाचा विषय आहे. सभागृहाला एवढ्या खिडक्या का, एवढी टेबल्स का हीसुध्दा पर्यावरणाचा विषय आहे. आपण एवढा मोठा प्रकल्प करणार आहात, तर सदरहू प्रकल्पाच्या रस्त्याची लांबी आणि किती कुटुंबे बाधित होणार आहे ही माहिती डिस्प्लेवर दाखविण्यात यावी. या चुकीच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालावर जनसुनावणी आयोजित करणे व स्थानिकांचा होकार घेणे हे कितपत योग्य आहे? तसेच सदरहू अहवाल ही कुठे कुठे चुकीचा आहे याबाबत पुढे चर्चा करण्यात येईल.

तसेच अहवालात लोकोपयोगी शब्दाचा वापर आहे, याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. कारण लोकांना सागून, त्यांच्या सहभागाने कुठे पाण्याचे, मातीचे नमुने गोळा केले, केव्हा घेतले, कुठल्या वेळी घेतले याचा काहीही उल्लेख नाही. निबंध लिहिल्याप्रमाणे हा अहवाल दिलेला आहे. हा अहवाल एनएचएआय प्रतिनिधी आरव्ही यांनी केला असेल, तरी हा अहवाल जिल्हाधिकारी यांनी रद्द करावा व नविन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केल्यानंतर परत जनसुनावणी ही आयोजित करण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना माहिती दिली की सदरहू प्रकल्पामुळे परंडा तालुक्यात ८८२ व्यक्ती प्रकल्पग्रस्त आहेत आणि तुळजापुर तालुक्यात २४३ प्रकल्पग्रस्त आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे माहिती दिली की पाण्याचे, हवेचे, मातीचे, ध्वनिचे नमुने हे पारित निर्देशांनुसार गोळा करण्यात आलेले आहेत.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी आक्षेप नोंदविला की अहवालातील सर्व माहिती ही चुकीची असून मी केलेल्या अभ्यासाप्रमाणे प्रति हेक्टरी १.४९ कुटुंबे येथे बाधित होणार आहेत.

त्यांनी उपस्थित ग्रामस्थांना विचारणा केली ज्यांच्या गावात पर्यावरण सल्लागार आरव्ही असोशिएट्सची कर्मचारी,प्रतिनिधी आलेले होते? उपस्थित सर्व ग्रामस्थांनी एकमताने कोणीही आले नव्हते असे सांगितले. म्हणजे हा अहवाला कुठे तयार केला, यात स्थानिक शेतकरी बाधित होणार त्याबाबत काहीही उल्लेख नाही, चुकीचा, दिशाभूल करणार हा अहवाल आहे. पर्यावरणाचे प्रश्न नाहीत. दोन जिल्ह्यातून हा रस्ता जात आहे. शेतकरी आणि पर्यावरण याच्यात सुसंगतता नसेल, तर या जनसुनावणीला काहीही अर्थ नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आपण जे मुद्दे उपस्थित करत आहात, त्याची उत्तरे ही देण्यात येतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री जाधव यांना सांगितले की आपण आपल्या सूचना, आक्षेप हे लेखी स्वरुपात सादर करावेत, त्याचे लेखी उत्तर पर्यावरण सल्लागार देतील.

सदरहू सर्व सूचना, लेखी उत्तरे ही बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येतील. मात्र जनसुनावणी ही रद्द करण्यास यावी ही मागणी मान्य करता येणार नाही

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी मत मांडले की माझी ही जनसुनावणी ही रद्द करा म्हणण्याची मागणी ही बैठकीच्या इतिवृतात घेण्यात यावी. आमची मागणी आहेच ही जनसुनावणी रद्द् करण्यात यावी. ही जनसुनावणी ही न्यायसमर्पक व्हावी अशीच आमची मागणी आहे. त्यांनी उपस्थित शेतक-यांना बैठक रद्द करण्याची मागणी मान्य आहे काय याबाबत विचारणा केली. सर्व उपस्थित शेतकरी, ग्रामस्थ यांनी एकमताने ही जनसुनावणी बैठक मान्य नसल्याची मागणीसाठी एकमताने हात वर केले. सर्व शेतक-यानी ही बैठक रद्द करण्याची मागणी केली याची इतिवृतात नोंद घेण्यात येईल असे अध्यक्ष यांनी सांगितले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू बैठक पर्यावरणविषयक असल्याने फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप हे नोंदविण्यात यावेत. बैठकीत इतर स्थानिक विषयसुध्दा उपस्थित करण्यात आले, त्याचीही नोंद घेण्यात आलेली आहे.

त्यावेळी श्री. जाधव यांनी आक्षेप नोंदविला की मनुष्यप्राणीसुध्दा पर्यावरणाच्या कक्षेत येतो. आम्ही सर्वजण बाधित होणार आहोत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आपल्या भावना कळल्या असे मत मांडले. आपण आपल्या सूचना, आक्षेप हे लेखी स्वरुपात द्यावेत. त्यांना प्रकल्प प्रवर्तक हे लेखी स्वरुपात उत्तर देतील आणि त्याप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सुधारणा करण्यात येईल. मुख्यतः आपण येथे सर्वजण हे ईआयए अहवालात सुधारणा करण्यासच आलेलो आहोत. जनसुनावणी प्रक्रिया सुरु होतानाच सांगितले होते की ही खुली चर्चा आहे.

श्री. महारूद्र विष्णु जाधव यांनी सांगितले की येथे मी सूचना, आक्षेप उपस्थित करत आहे, ते सामाजीक आहेत, काहीजण वैयक्तिक सूचना, आक्षेप नोंदवितील. सदरहू बैठकीचे इतिवृत येथील ग्रामस्थांना उपलब्ध करुन देण्यात यावे. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी होकारार्थी उत्तर दिले. अध्यक्ष यांनी उपस्थितांना आवाहन केले की आपण आपल्या सूचना, आक्षेप लेखीस्वरुपात सादर कराव्यात.

श्री. महारूद्र विष्णु जाधव यांनी पुढे आक्षेप नोंदविला आमच्या शेतातून, रानातून, घरावरुन जो रस्ता जाणार आहे, त्याबाबतचा चुकीचा अहवाल जर उपलब्ध करण्यात येत असेल, तर आम्ही विरोध करायचा नाही का? अहवालातील सर्व भाषासुध्दा ही अत्यंत चुकीची आहे. त्यांनी सांगितले की शेवटच्या पानावरिल खालून तिसरी ओळ - यात उदकले म्हणून १,८२,००० टाकणार आहेत. तर उदकले म्हणजे काय? (पान नं. २७) – श्री. जाधव यांनी मागणी केली की पर्यावरण सल्लागार यांनी चुकीचा अहवाल केल्याबद्दल आरव्ही एसोशिएटसला दंड आकारण्यात यावा. तसेच आमच्या गावातील लोकांना जाण्यायेण्याचा खर्च हा आरव्ही असोशिएटसने द्यावा. अनेक चुकीचे शब्द अहवालात उतघृत करण्यात आलेले आहेत. आता ३६ ग्रीन फिल्ड हायवेज होणार आहेत. तर माझा या चुकीच्या ईआयए अहवालावर व त्यावर होणा-या या

जनसुनावणीवर आक्षेप आहे. त्यावेळी उपस्थितांनी बहुसंख्येने हात वर करुन आक्षेप नोंदविला. श्री जाधव यांनी २६ नंबर पानवर खालून तिसरा परिच्छेद, पुर्ण चुकीची भाषा — ही आमची मराठी नाही. असे कायद्यात चालत नाही. हे चुकीचे आहे.

त्यावेळी अध्यक्ष यांनी मत मांडले की ज्या चुकीच्या गोष्टी आहेत, त्या सांगाव्यात. श्री जाधव यांनी मत मांडले की आमचे मराठी नाही. पर्यावरण सल्लागार यांनी चुकीच्या शब्दांबद्दल दिलगिरी व्यक्त केली अध्यक्ष यांनी ज्या काही व्याकरणात चुका झाल्या, त्या दुरुस्त करण्यात याव्यात.

श्री. जाधव यांनी सांगितले की मी शेतकरी कुटुंबातील असून माझा कोणालाही त्रास देण्याचा हेतू नाही. शासनास अभिप्रेत असलेले काम हे पर्यावरण सल्लागार यांनी करणे अपेक्षित आहे. जनतेला पर्यावरणाबाबत अवगत करणे हे त्यांनी करावे, त्यासाठी अहवालात त्रुटी दूर करण्यात याव्यात. श्री. जाधव म्हणाले की पर्यावरण सल्लागार यांनी बैठकीत सांगितले की त्यांनी १९ गावात, २२ गावात सर्वेक्षण केलेले आहे. मात्र त्याबाबत कुठे सर्वेक्षण केले याचा उल्लेख नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कार्यकारी सारांश अहवाल वाचला असता त्यात प्रत्येक पानावर अनेक व्याकरणाच्या चुकासुध्दा दिसून येता. तरी आदेश देण्यात येत आहेत की उपलब्ध केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (ईआयए) पुन्हा दुरुस्त करण्यात यावा व नंतर तो पुन्हाः सर्व अधिसूचित शासकीय कार्यालयांना परत उपलब्ध करुन देण्यात यावा. जनसुनावणीचा मूळ उद्देशच आहे की अहवालातील सर्व मजूकर, प्रस्तावित प्रकल्पाविषयीची सर्व माहिती ही जनतेला समजेल असाच अहवाल असावा. त्यासाठीच त्या त्या राज्यातील राज्यभाषेत सर्व शासकीय अहवाल हे उपलब्ध असतात. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी. आपण भाषांतराचे स्वागतच करत आहोत.

२) **श्री. <u>गोरंडगे, राहणार- काटी. तालुका- तुळजापूर, जिल्हा-धाराशिवः</u>- (<u>मोबाईल</u> नं. ९६२२१८८४३४)**

तुळजापूर तालुक्यात १९ (एकोणीस) गावे आहेत, तर अकरा गावे लिहिलेली आहेत. तर आठ गावे कुठली गाळलेली आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की तुळजापूर तालुक्यात अकराच गावे आहेत, त्यांनी गावांचा नांवे वाचून दाखविली, कुटेवाडीपासून तुळजापूरपर्यंत गावांची नावे काटी, दहिवडी, सावरगाव, सालिका, सुरतगाव, पिंपळा बुद्रुक, पिंपळा खुर्द, देवकुळी, खुंटेवाडी, धोत्री, काटी.

३) त्यावेळी खडकी येथील ग्रामस्थ यांनी आक्षेप नोंदविला की खडकी गाव वगळण्यात आलेले आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की खडकी गावाच्या बाहेरुन रस्ता जातो.

४) तसेच त्यांनी आक्षेप नोंदविला की, काटी या गावचे रहिवाशी यांनी आक्षेप नोंदविला की काटी गावाच्या मधून रस्ता जातो. माझी तीन्ही बोअर आणि पाच हजार झाडे बाधित होत आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे माहिती दिली की यासाठी संबंधित कार्यालयांनी एक पूर्ण संघ (टीम) पाठविलेला होता, त्यांनी सर्व बाबींचा विचार करुन रस्त्याचे आरेखन मंजूर करण्यात आलेले आहे.

**५) श्री बाळाजी पाटील, पिंपळापूर खुर्द, तालुका. तुळजापूर जिल्हा-धाराशिवः-**

त्यांनी आक्षेप नोंदविला की जमिन अधिग्रहित करताना त्या समितीसोबत जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी सोबत असणे आवश्यक होते. त्यांच्याबरोबर कोणीही नव्हते. पर्यावरण सल्लागार हे चुकीची माहिती देत आहेत, त्यांच्याबरोबर कोणीही नव्हते. तसेच एखाद्या सर्वे नंबरवर पंचवीस शेतकरी असतील, त्यांचे शेतीक्षेत्र हे वेगवेगळे असू शकते. मात्र सरसकट पैसे दिलेले आहेत.

६) **श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल** यांनी मागणी केली की जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांचे समाधान, पुर्तता होत नाही, तोपर्यत पर्यावरण अनुमती देण्यात येऊ नये.

श्री मारुती विष्णु जाधव यांनी स्वतःच्या शेतीचा मोजणी नकाशा दाखविला व त्यातील त्रुटी सांगितल्या. त्यांनी सांगितले की एकत्रित १० कि.मी.चा नकाशात एकही झाड, विहिर दाखविलेले नाही. पर्यावरणाचे पुरावेच जर नकाशात नसतील, तर त्याचा काहीही उपयोग नाही. मग आम्ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत पर्यावरणाचे मुद्दे काय मांडणार? माझ्यासारखेच अनेकांच्या त्रुटी आहेत. तरी सर्वांची पूर्तता होईपर्यंत पर्यावरण अनुमती प्रदान करण्यात येऊ नये ही विनंती.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रांत अधिकारी कार्यालयाने शासनाचे सर्व निर्देश वेळोवेळी पाळले असून बाधित शेतक-यांना, स्थानिकांना मोबदला देण्यात आलेला आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की भूसंपादनाच्या विषयासाठी संबंधित विभागाबरोबर वेगळी बैठक आयोजित करता येऊ शकेल.

**६) श्री. श्रीकांत हरिपंत कुलकर्णी, तालुका. तुळजापूर, जिल्हा-धाराशिवः-**

माझ्या मुलाचे म्हणजे माझे शेत आहे. तो तीन कि.मी. परिसर आहे, त्यातून पाणी येते, त्यासाठी मी नाला केलेला होता. त्यामुळे माझ्या शेताला पाणी देऊ शकतो होतो. या प्रकल्पाच्या रस्त्यामुळे पाणी तेथेच साचणार आणि माझी जमिन अतिपाण्यामुळे खराब होणार. त्या नाल्याचा उल्लेख पर्यावरण सल्लागाराच्या अहवालात नाही.

दुसरा मुद्दा - प्रस्तावित रस्ता हा माझ्या शेताच्या मधून जात आहे, मी आहे, माझी बैल, माझा ट्रॅक्टर आहे, आम्ही पलिकडे कसे जायचे?

तसेच रस्ता १५ फूट उंच असतो, त्यावेळी रस्ता बांधताना वाळू, माती, धुराळा यामुळे आमचे शेत बाधित होणार आहे.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की शेतातून जो नाला जातो, त्याला आम्ही हातही लावणार नाही. नैसर्गिक प्रवाहात आम्ही बदल करणार नाही. त्यासाठी पूल, कल्वर्ट लागल्यास ते बांधण्यात येईल. तसेच प्रत्येक ५०० मीटर अंतरावर पलिकड्च्या बाजूस जाण्याची सोय करण्यात आलेली आहे. प्रत्येक ५०० मीटर ठिकाणी अंडर पास करण्यात आलेले आहेत.

त्याचप्रमाणे ६० मीटर रस्ता होत नाही, तर त्याठिकाणी बांधकाम साहित्य टाकले जाणार आहे. त्याठिकाणी पाणी शिंपडणार आहोत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की गावातील जे रस्ते आहेत, त्याठिकाणी अंडरपास केलेले आहेत.

अध्यक्ष यांनी सांगितले की नैसर्गिक प्रवाहात बदल करण्यात येणार नाही.

७) **श्री. महारूद्र विष्णु जाधव रा. रोहकल, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी** आमच्या दख्खन पठारातील जमीनीवर फक्त दोन महिने नाले वाहतात. इतर वेळी सर्व जमिनी या कसल्या जातात. पावसाळ्यानंतर तीन कि.मी. पाणी पावसाळ्यानंतर दिसणार नाही. अशा स्थितीत यांच्या शेतात खूप पाणी येणार, आपण पाण्यास बांध घालणार, बांध घातल्यानंतर त्यांच्या शेतात पाणी अडणार, त्यावेळी श्री श्रीकांत कुलकर्णी यांनी काय करावे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आम्ही प्रथम त्या क्षेत्राचे सर्वेक्षण केले, त्यानंतरच आरेखन केलेले आहे. श्री मारुती विष्णु जाधव यांनी सांगितले की जे सर्वेक्षण करण्यात आले, ते कुठेही प्रकाशित करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे पर्यावरण सल्लागार आर.व्ही. असोशिएटस् आणि प्रकल्प प्रवर्तक एनएचएआयने जनतेत सर्वेक्षण करताना स्थानिकांच्या अडचणी येऊन विचारणा केलेली नाही. माझ्या अभ्यासाप्रमाणे धाराशिव जिल्ह्याती, १०,७०० लोक बाधित प्रत्यक्षपणे होणार आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ही तांत्रिक मुद्दा आहे. आम्ही टेंडरमध्ये तरतुद केलेली आहे की ज्याठिकाणी लोक म्हणतात की आम्हांला पाण्याचा प्रवाह पाहिजे, ती तरतुद आम्ही टेंडरमध्ये ठेवलेली आहे.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी पुढे मागणी केली या अहवालाप्रमाणे जर आपण पर्यावरण अनुमती घेणार असाल, तर प्रत्येक मुद्दावर आम्ही प्रतिज्ञापत्र मागितलेले आहे. प्रकल्प प्रवर्तक एनएचएआय, पर्यावरण सल्लागार आर.व्ही. असोशिएटस् आणि भविष्यात ते नियुक्त करणारे कंत्राटदार यांचे आम्हांला प्रतिज्ञापत्र पाहिजे. कुठल्याही शेतक-याच्या सूचनेचे उल्लंघन करणार नाही,

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी पुढे सांगितले की आता वीस कि.मी. रस्त्याचा नकाशा आणलेला आहे. येथे १५०-२०० वर्षांची झाडे आहेत. त्या झाडांवर आमच्या अनेक पिढ्यांशी संवाद साधणारे पक्षी राहतात. येथे मी आरोप करतो की ती झाडे जाणूनबूजून नकाशावर दाखविण्यात आलेली नाहीत. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जी झाडे तोडणार आहेत, ती परिशिष्टात दाखविली असून जेवढी तोडणार, त्याच्या दुप्पट झाडे लावण्यात येणार आहेत.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी किती झाडे तोडणार याची माहिती बैठकीत सांगण्याची सूचना केली.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की येथे श्री हरिपंत कुलकर्णी,राहणार—गट नंबर २७/१,ता. परंडा, जिल्हा-धाराशिव यांनी मत मांडले की शेतात जे पाणी नाल्यावाटे येते, ते रस्ता बांधल्यानंतर नाल्यातील पाण्यात बदल होईल. ते बरोबर आहे. तर नाल्याच्या पाण्यात शेती होत असेल आणि नाल्याच्या पाण्यात जर बदल होत असेल, तर बैठकीत उत्तर दिल्याप्रमाणे जे कल्व्हर्ट बसविणार आहेत, ते कुठे बसविणार आहेत, त्याचे नियोजन झालेले आहे काय? किती नाले आहेत, त्यांचे पाणी शेतीसाठी वापरण्यात येते. जर त्याचे नियोजन झालेले

असेल, तर श्री हरिपंत कुलकर्णी, राहणार—गट नंबर २७/१,ता. परंडा, जिल्हा-धाराशिव यांच्या नाल्याजवळ कल्व्हर्ट बसविणार आहेत काय?

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की धाराशिव जिल्ह्यात किती ठिकाणी कल्व्हर्ट बसविणार, शेतक-यांचे किती नाले वाचविण्यासाठी कल्व्हर्ट बसविणार आहेत याची माहिती प्रकल्प प्रवर्तकांच्या कुठल्या विभागाने तयार केली व कुठल्या शासकीय अधिसूचित कार्यालयात ती उपलब्ध करण्यात आली? ती येथे सादर करण्यात यावी.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी सूचना केली जर आता ती माहिती उपलब्ध नसेल, तर ती स्थानिकांना व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती उपल्बध करुन देण्यात यावी. सदरहू माहिती बैठकीच्या इतिवृतासोबत भारत सरकारला सादर करण्यात येईल.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी आक्षेप नोंदविला की नाला कुठेकुठे आहे हे भूमीअभिलेखन विभागात नोंद असते, वर्षांनुवर्षाची नोंद असते, ती पर्यावरण सल्लागार यांच्याकडे नाही ही गंभीर बाब आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना विचारणा केली की धाराशिव जिल्ह्यात किती ठिकाणी शेतक-यांच्या शेतीनाला येथे कल्व्हर्ट करणार याची यादी आहे काय? नसल्यास, ती उपलब्ध करुन देण्यात यावी, जेणेकरुन ती बैठकीच्या इतिवृतासोबत भारत सरकारला सादर करण्यात येईल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की धाराशिव जिल्ह्यात एकूण २४१ नाले आहेत. तर स्थानिकांच्या मागणीनुसार ज्याठिकाणी कल्व्हर्ट बसविणार आहेत, ते सर्व एकदाच बसविण्यात यावेत. याची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कल्व्हर्ट बसविण्यात येतील.

८) **श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल** यांनी किती झाडे कापणार आहात, याची माहिती सांगण्याची सूचना केली. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की श्री. महारूद्र विष्णु जाधव यांनी रास्त प्रश्न विचारला आहे. एका बाजूस झाडे लावा, झाडे जगवा म्हणतो, तर दुस-या बाजूस प्रकल्पासाठी झाडे तोडावी लागतात, त्याची नुकसानभरपाई करावी लागते. तरी झाडांची संख्या गावनिहाय सांगण्यात यावी. त्यावेळी श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी मागणी करताना सांगितले की जसे समुद्रात हिमनग असतो, तो १/३ पाण्याच्या वर असतो, तर ३/४ भाग पाण्यात असतो, तसेच येथे प्रकल्प प्रवर्तक हे झाडांची संख्या सांगत आहेत. त्यांनी किती वर्ष पूर्ण झालेली (वयाची) झाडे घेतली आहेत, ते सांगावे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की येथे पाच वर्षांपूर्वीची झाडे घेतलेली असून धाराशिव जिल्ह्यात ३,००० (तीन हजार) झाडे तोडावी लागणार आहेत. येथे श्री श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी पर्यावरण सल्लागार यांना तयार केलेल्या मराठी कार्यकारी सारांश अहवालातील झाडांची माहिती वाचून दाखविण्याची मागणी केली.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी मत मांडले की प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जी झाडे लिहिलेली आहे, त्याची नांवेसुध्दा चुकीची लिहिलेली आहेत. तर त्यावेळी अध्यक्ष,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण सल्लागार यांनी शास्त्रीय/बोटॅनिकल नांवे दिलेली आहेत असे सांगितले. तर प्रत्येक झाडांच्या समोर देशी नावे अहवालात देण्याचे आदेश अध्यक्ष यांनी पर्यावरण सल्लागार यांना दिले.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी परत आक्षेप नोंदविताना सांगितले की जरी आमच्या परिसरात नैसर्गिक उगविलेली झाडे असतील, तरी त्यांचे संगोपन आम्ही केलेले आहे. तर प्रकल्प प्रवर्तकांनी एक महिन्यापेक्षा जास्तीची झाडे विचारात घेणे आवश्यक आहे. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की झाडे तोडताना प्रकल्प प्रवर्तकांना शासकीय निर्देशांचे पालन करावेच लागणार आहे, त्यामुळे झाडे किती वर्षांची असावीत याबाबत शासकीय निर्देश पाळण्यात येतील. अध्यक्ष यांनी सांगितले की मी स्वतः व कंपनी आणि स्थानिक याबाबत काहीही करु शकत नाहीत. चर्चेनंतर अध्यक्ष यांनी सूचना केली की पाच वर्षांच्या पुढची झाडे गृहित धरण्यात यावीत. त्यावेळी श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी हे चुकीचे आहे असा आक्षेप नोंदविला. त्यावेळी अध्यक्ष यांनी सूचना केली की आपण याबाबत लेखी सूचना कळवावीत, त्याबाबत शासन पुढील निर्णय घेईल.

९) श्री **श्रीकांत हरिपंत कुलकर्णी, तालुका-परंडा, जिल्हा- धाराशिव,** यांनी माहिती विचारली की आमचे शिक्षण कमी आहे, त्यामूळे संपूर्ण इंग्रजी कळेल असे नाही. तरी आम्ही प्रकल्पाबाबत आक्षेप नोंदवू शकतो काय? त्याचा कालावधी किती दिवसांचा असेल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की बैठकीत सर्वांनाच प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधी देण्यात येते. त्याचप्रमाणे या जनसुनावणीत लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधि उपस्थितांना देण्यात येते. लेखी सूचना बैठकीनंतरही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर व प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, संभाजीनगर सादर करण्यात यावेत.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीसच उपस्थितांना अवगत करण्यात आलेले आहे की ही समिती कुठलाही प्रकल्प मंजूर करत नाही, प्रकल्प नाकारत नाही किंवा प्रकल्पाची शिफारस करत नाही. प्रस्तावित प्रकल्पाविषयी स्थानिकांनी उपस्थित केलेले पर्यावरणीय सूचना/आक्षेप नोंदविण्यासाठी गठित करण्यात आलेली असून बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येऊन ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती प्रकल्पाविषयी योग्य तो निर्णय घेत असते.

१०. **श्री. महारूद्र विष्णु जाधव,** रा. रोहकल यांनी स्पष्टीकरणासाठी पहिला मुद्दा वाचून दाखविला — तक्ता क्रमांक मुद्दा क्रंमाक - २ — **प्रस्तावित प्रकल्पाची अभियांत्रिकी वैशिष्ट्ये:-**

यात प्रत्यक्ष जागेवर पहाणी करुन अभ्यास केल्याचे दिसून येत नाही. स्थानिक लोकांची विचारपूस करुन अडचणी दूर करण्यासाठी प्रत्यक्ष अहवाल केलेला दिसून येत नाही. तसेच minor bridge, RoR, RoB व इतर यांचे काल्पनिक पध्दतीने लेखन केल्याचे दिसून येत आहे. किंवा यासंदर्भात गावनिहाय पंचनामा, ग्रामपंचायत कार्यालयात कोणत्याही प्रकारच्या सूचना, हरकती , प्रकल्पाच्या अधिसूचना/सूचना घेतल्याचे दिसून येत नाही.

२.३ **रहदारी विश्लेषण -**

या संदर्भात वाहतुकीचा जो अंदाज २०२५-२०५५ वर्तविला आहे, त्यास कोणताही शास्त्रीय पुरावा उपलब्ध केलेला नाही. जर जोडलेला असेल, तर ग्रामपंचायत कार्यालयांनी तो सर्व शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात यावा.

२.४ **बांधकाम कालावधी** -

सदरह प्रकल्पाचा बांधकाम कालावधी ही तीन वर्षाचा दाखविला आहे. तो कालावधी वाढू शकतो. त्याबाबत तरतुद व पुढील वाढीव बांधकाम कालावधी याबाबतचे नियोजन येथे दर्शविण्यात आलेले नाही. कारण वाढीव बांधकामाचा त्रास येथील शेतकरी, सामान्य नागरिक यांना भोगावा लागणार आहे. बांधकाम कालावधी वाढला, तर शेताजवळील पाण्याची पातळी, राडारोडा यामुळे तेथील शेतकरी, सामान्य नागरिक यांना भविष्यात होणारा त्रास व पर्यावरण हानी याची नुकसानभरपाई, ही नमुद करण्यात यावी. त्याबाबतील नियोजन व वाढीव नुकसानभरपाई ही नमुद करण्यात यावी.

२.५ **प्रकल्पाची किंमत** –

ही ढोबळमानाने प्रकल्पाची किंमत रुपये ७,२१९.४८ कोटी काढलेली आहे. त्यात शेतजमिनी, बांधकाम खर्च, विविध सुविधा खर्च (amenities) येथे दर्शविण्यात आलेला नाही. प्रत्येक ग्रामपंचायती क्षेत्रातील खर्च त्या त्या ग्रामपंचायत कार्यालयात देण्यात यावा.

३. **पर्यायी विश्लेषण** -

प्रकल्पाचे अंतर, कार्बन उत्सर्जन कमी होईल असे प्रकल्पाबाबत नोंद केलेली आहे. सदरहू विश्लेषण हे काल्पनिक आहे कारण प्रस्तावित रस्त्यापासून २०० मीटर अंतरावरिल वस्तीचा अहवालात उल्लेख नाही. त्यावेळी बैठकीत बहुतांश उपस्थितांनी जे २०० मीटर अंतरावर राहतात, त्यांनी हात वर केले.

तसेच प्रस्तावित ग्रीन फिल्ड हायवेला लागून/जवळ असलेले मोठमोठे तलाव, नागरी वस्त्या यांचा उल्लेख नाही. त्याबाबत नुकसानभरपाई, तरतुद यांचा कुठेही उल्लेख नाही.

४. पर्यावरण प्रयोगशाळा व्हिजन लॅबोरेटरीज, हैद्राबाद यांनी एप्रिल, २०२३ ते जुन, २०२३ यांनी तीन महिने फक्त सर्वेक्षण करुन सदरहू प्रकल्प हा आमच्यावर लादलेला आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. कमीत-कमी एक वर्षाचा अभ्यास केलेला पाहिजे. दर महिन्याला येथील वातावरण बदलते. आमच्या येथे एक अतिरिक्त क्रुतु आहे – तो म्हणजे अवकाळी.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सूचित केले की ईआयए अधिसूचना, २००६ नुसार सदरहू अहवाल हा तयार करण्यात आलेला आहे. त्यांनी निर्देश दिल्यानुसार अभ्यास करण्यात आलेला आहे.

श्री. महारूद्र विष्णु जाधव, रा. रोहकल यांनी आक्षेप नोंदविला सर्वेक्षण करताना १० कि.मी. परिघातील कोणताही गावनिहाय प्रतिनिधी आलेला दिसून येत नाही. प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाचा विशेष अभ्यास केलेला दिसत नाही. अहवालातून १० कि.मी. परिघाचे अवाजवी चित्र दाखविण्यात आलेले आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी प्रतिपादन केली की ईआयए अधिसूचनेतील निर्देशांनुसारच सर्वेक्षण करताना स्थळ (spot) निवडण्यात येते. त्यानुसारच स्थळ आणि अभ्यास केला जातो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री मारुती विष्णु जाधव व इतर यांनी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेण्याची सूचना केली.

१०) **श्री आदीनाथ गजेन्द्र ताकमोगे, रा. देवकुरळी, तालुका-तुळजापूर, जिल्हा- धाराशिवः-**

मी एक बाधित शेतकरी आहे. माझ्या शेतीतून हा हायवे गेलेला असून माझी पाण्याची विहिरसुध्दा बाधित होत आहे. जो मोठा रस्ता जाणार आहे, तेथे मोठा पूल होणार असून तेथील विहीर वाचविता येईल काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जर पूलाखाली जर विहिर येत असेल, तर ती निश्चितपणे वाचविता येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सूचना केली की पाण्याचा स्त्रोत ही कुठेही असला तरी तो वाचविलाच पाहिजे. तर याबाबत निर्णय घेऊन ती विहिर वाचविण्यात यावी.

येथे काही उपस्थितांनी त्यांच्या द्राक्षबागांविषयी व भूसंपादनाविषयी प्रश्न उपस्थित केला असता भूसंपादन विषय वेगळा असल्याचे सांगण्यात आले.

**११) श्री. भरत भिल्लारे , तालुका- परंडा, जिल्हा- धाराशिवः-**

त्यांनी सूचना केली की आमच्या परंडा तालुक्यातील गावागावात जाऊन रस्ता कसा जातो याविषयी माहिती देण्यात यावी. तसेच पाणी पुरवठा व पाणी निःस्सारण, त्याचप्रमाणे रस्ता कसा जातो याबाबत जनजागृती करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ही स्वागतार्ह सूचना असल्याचे मत मांडले. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रत्येक गोष्टी या विश्वासात घेऊनच त्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

१२) **श्री. सतीश बाबूराव शेळके, रा. सांगविकाटी, तालुका- तुळजापूर, जिल्हा-धाराशिवः- ९३२३१३००९६**

आमचे क्षेत्र आहे सुरतगावमध्ये. आमचा गट नंबर दाखविलेला असून सहा एकर क्षेत्र बाधित होत आहे. मात्र आमच्या मोजणी झालेले नाही, कोणीही आमच्याकडे आलेले नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की अजून मोजणी बाकी आहे.

अध्यक्ष – मोलाच्या सूचना दिल्या

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत मोलाच्या सुचना उपस्थितांनी दिलेल्या असून बैठकीच्या सुरवातीस सांगितलेले आहे की ही जनसुनावणी आपले विचार, सूचना, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून येथे कोणताही निर्णय घेण्यात येत नाही. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व आयोजक यांना पुढील कार्यवाही करण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत मराठी व इंग्रजीत तयार करुन ते सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप, प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेईल.

आयोजकपर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानून मा. अध्यक्षा यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेल्या ३९ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

**(परमेश्वर डी. कांबळे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
लातूर

Sub-Regional Office M.P.C. Board LATUR

**(सुजित ढोलम)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

**(महेंद्रकुमार कांबळे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव,
जिल्हा - धाराशिव

"All the 17 pages are signed by me."